
# ॥ मनसुभे ॥

कितीही युगे झाली, होऊन गेली, होतीलही पण काळ हा कारण आहे. पंढरपुरचेच उदाहरण घ्या. संत नामदेवांनी काव्य रचलंय "युगे अठ्ठावीस विटेवरी उभा" आरती म्हणतांना भावार्थ घेतला तर असे दिसते. भक्त पुंडलिकाने आई-वडीलांची सेवा करतांना पुंडलिकाला विठ्ठल रखुमाईने दर्शन दिले. आता कलियुग सुरु झाले आहे. तीन चरण संपले. मनुष्य पोटासाठी गावोगाव हिंडतोय, बायको मुलांच्यात रमतोय, आई-वडीलांना वृद्धाश्रमात पाठवतोय. बदलत्या काळात पुन्हा कशाचीही पर्वा न करता अधर्माकडे ओढला जातोय. भावी काळात आपणही आई-बाप होतोय व मुलामुलींपासुन दूर जातो. भक्ती नाही, धर्म नाही, जात नाही पण माणूस माणसुकीला दुरावत चालला आहे. हेच खरे आहे.

पूर्वी एक काव्य होतं "गणपतवाणी बिडी पितांना बांधायच्या मनात माडी" अन मनाशीच म्हणायचा या जागेवर बांधीन माडी. हा शेखचिल्ली टाईप माणूस उशीवर डोके ठेवुन घरातल्या आढ्याकडे पहात स्वप्न पहात होता. त्याकाळी कोणतीही वस्तु आढ्याला मडक्यात बांधून ठेवलेली असे. हा गणपतवाणी बिडी ओढतांना झुरक्यावर झुरके सोडत असे. बायको मुलांची स्वप्न पहात त्यांना शिस्त लावीन, त्यांनी नाही ऐकले तर लाथ मारीन असा विचार करत त्या मडक्याला लाथ मारतो. मडके शिंकाळ्यासकट तुटुन खाली पडले आणि त्याला एकदम जाग येते. आपल्या स्वतःचा विचार नाही पण दुसऱ्यावर अवलंबुन रहावे, दुसऱ्याचा मत्सर, निंदा करणे किती घातक ठरते हे दिसुन येते. मनाची स्थिती आकाशात उडणाऱ्या पतंगासारखी असते. उडविणारे अनेकजण असतात. कुठल्यातरी पतंगाचे आयुष्य संपुष्टात आलेले असते. बालपण, तरुणपण संसार करतांना सुख-दुःखे सोबती असतातच असे नाही. म्हातारपणी स्त्री पुरुष असा भेदभाव ठेवत नाही. म्हातारपणी खाली वाकुन जातांना गेलेले आयुष्य शोधत, बरोबरीचे सखे सोबत्यांचे सुख-दुःखाचे अनुभव घेत, आयुष्याचे गणित करत. दुनियेचा निरोप घेतो व निरोप घेतांना रचलेले मनसुबे पुरे होतातच असं नाही. आणि सर्वांचा निरोप घेतो.



सौ. अनघा आपटे
सोना पार्क ७/३
कोथरुड
mb-9146398897